स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक** 12–09–2016 रोजी **दुपारी** 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 3. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 4. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 7. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 8. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 10. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 11. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 12. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 2. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 3. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 492</u>:– {लोककर्म झोन 1} प्रभाग क्र. 55 'अ' अंतर्गत सुरेंद्र नगर व विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रू. ३४,९४,५०५/– (चौतीस लक्ष, चौऱ्यान्नव हजार, पाचशे पाच रूपये फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 493</u>:– {लोककर्म झोन 1} प्रभाग क्र. 55 'अ' अंतर्गत एस.ई. रेल्वे कॉलोनी, अत्रे ले–आऊट व पी. ॲन्ड टी. कॉलोनी येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रू. ३४,९४,७५०/– (चौतीस लक्ष, चौऱ्यान्नव हजार, सातशे पन्नास रूपये फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 494</u>:– {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 68/ब मध्ये सोमलवाडा गावात सिमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. २९,९९,६४५/– (एकोनतीस लक्ष, नव्यान्नव हजार, सहाशे पंचेचाळीस फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 495</u>:– {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. ४१ ब महाल येथे कुंभारपूरा, गाडीखाना मस्जिद जवळ आर.सी.सी. पाईपलाईन टाकणे व सिमेंट रोडचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. २९,९९,९८०/– रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६७९ व नविन पद क्र. A४२००१४७०५११ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 496</u>:– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 20 (अ+ब) मधील लष्करीबाग येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाच्या रु. 29,99,900/– रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 497</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 33 ब मधील डिप्टी सिग्नल मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट पेव्हमेंट करण्याबाबत रु. 25,67,394/– राशीचे प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 498</u>:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 33 ब मधील डिप्टी सिग्नल पाणी टंकी जवळ, ना.सु.प्र. हॉट मिक्स प्लॉन्टचे मागे कॉंक्रीट रस्ता बांधकामाकरिता रु. 25,99,208/– राशीचे प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 499ः– {लोककर्म झोन 06}** प्रभाग क्र. २८ ब मोमीनपूरा डोबीनगर श्री गुलाम रसूल ते श्री इरसाद नवसाद् यांचे घरापर्यंत नाल्याची आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रू. २५,९७,६९१/– रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६१८ व नविन पद क्र. A43901370812 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 500ः– {लोककर्म झोन 09}** प्रभाग क्र. 4 (अ) येथील यादवनगर, महेंद्रनगर, फारुखनगर येथे सिमेंट कॉंक्रीट बांधकाम करण्यास्तव रु. 34,83,510/– रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 501ः– {लोककर्म झोन 06}** महाराष्ट्र नगरोथ्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत एकुण रु.1,17,46,772/ रक्कमेचा 9 (नऊ) कामाचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचे असून एकुण रकमेच्या 50 टक्के रु. 58,73,386/– म.न.पा. चा सहभागास मंजुरी प्रदान करण्याचा तसेच या करिता म.न.पा. अंदाजपत्रकात नविन व्यय पदाचे निर्माण करुन, त्यात रु. 58,73,386/–रकमेचा तरतूद करण्याचा तथा मध्य नागपूर क्षेत्रातील खालील दिलेल्या यादीनुसार एकुण 9 कामांना समावेश करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. A42001360905 या मधून हा खर्च प्रस्तावित करावा. नवीन पद निर्माण करण्याची आवश्यकता नाही या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय राशी |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र. 39 महात्मा गांधी आदर्श विद्यामंदीर च्या मागे भुजाळे मोहल्ला आणि सरोदे कॉम्पलेक्सच्या जवळ सिव्हर लाईन व आर सी. सी. चेंम्बर बनविणे. | 1499945/- |
| 2. | प्रभाग क्र. 38 जुनी मंगळवारी गुजरी चौक ज दुर्गा इलेक्ट्रीकल ते डॉ सर्वि पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे. | 1499399/- |
| 3. | प्रभाग क्र. 39 महात्मा गांधी ढोबळे गल्ली श्री. वेळेकर ते ईषा ब्युटी पार्लर पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे. | 1499781/- |
| 4. | प्रभाग क्र. 31 मस्कासाथ इतवारी सिटी पोस्ट ऑफीस समोर रॉयल कलेक्शन ते भुमी कॉम्पलेक्स पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे. | 1499174/- |
| 5. | प्रभाग क्र. 31 मस्कासाथ ऑटो स्टॅंड ते भैय्यालाल गंगाधर जैन पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे. | 1499617/- |
| 6. | प्रभाग क्र. 39 जुनी मंगळवारी नटराज टॉकीज जवळ सामाजीक सभागृह बांधणे | 1036592/- |
| 7 | प्रभाग क्र. 39 महात्मा गांधी जुनी मंगळवारी, लकडापुल पोलीस चौकी जवळ सामाजीक सभागृह बांधणे. | 1499447/- |
| 8. | प्रभाग क्र. 31 मस्कासाथ बंगाली पंजा स्कुल ते श्री. परवेश भाई यांच्या घरापर्यंत पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे. | 1013449/- |
| 9. | प्रभाग क्र. 31 मस्कासाथ येथील हिंदुस्थान विद्यालय जवळ श्री. सुनील उमरडेकर यांच्या घरासमोर भुमीगत आर. सी. सी. पाईप लाईन टाकणे. | 699368/- |

**ठराव क्रमांक 502ः– {लोककर्म झोन 10}** प्रभाग क्र. ८ अ व ब मध्ये विविध रू. २९,९९,५७१/– एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार पाचशे एकाहत्तर रू. फक्त) च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 503</u>:– प्रभाग क्र. 61–ब ताजबाग परीसरात जाफर भाई ते
{लोककर्म झोन 05} बब्बु भाई कपडेवाले, नायडु ते अक्कु भाई यासिन प्लॉट आझाद भाई ते सिकंदर भाई, गौसीया कॉलनी येथील रस्त्यांचे सिमेंटीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. २६५०८०२/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 504</u>:– प्रभाग क्र. 49–अ अंतर्गत उंटखाना चौक ते अजंटा
{लोककर्म झोन 03} हॉल पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंटीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. २७६४८१४/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 505</u>:– प्रभाग क्र. 60 अ सक्करदरा येथील भांडे प्लाट व
{लोककर्म झोन 05} सुर्वे ले–आऊट येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. ४५३८४८२/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 506</u>:– शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होत असतो
{आरोग्य विभाग} अश्या परिस्थितीत त्यावर आळा घालण्याकरीता भारतीय बनावटीची एकुण ५ नग व्हेईकल माऊटेंन्ड मशीन खरेदी करणे आवश्यक असुन सेंट्रल इंडिया इंजिनियरींग कंपनी शांतीनगर नागपुर हे मशीन चे पुरवठादार असुन त्यांचा भारत सरकारशी झालेल्या करारनाम्यानुसार दर करार प्रती मशीन ९,२१,२००/– नुसार मंजुर आहे. त्यानुसार सेंट्रल इंडिया इंजिनियरींग कंपनी शांतीनगर नागपुर यांचे कडुन विभागा करीता एकुण ५ नग मशीन खरेदी चा प्रस्ताव आहे. या करीता येणारा एकुण खर्च रुपये ४६,०६,०००/– अपेक्षित असुन हा खर्च आय–व्यय पद क्रमांक A४३४०११७१६०२ मधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 507</u>:– प्रभाग क्र. 68/ब मध्ये चिंचभवन व सोमलवाडा {लोककर्म झोन 01} गावातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४०,९५,६५०/– (चाळीस लक्ष, पंच्यान्नव हजार, सहाशे पन्नास फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 508</u>:– प्रभाग क्र. 68/ब चिंचभवन गावात सिमेंट रस्त्यांचे
{लोककर्म झोन 01} बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. २९,९५,४५०/– (एकोनतीस लक्ष, पंच्यान्नव हजार, चारशे पन्नास फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 509</u>:– प्रभाग क्र. २३ अ मधील विविध ठिकाणी सी. सी.
{लोककर्म झोन 08} रोडचे बांधकामास्तव रू. ४९,९९,४१८/– (एकोणपन्नास लक्ष नव्यानऊ हजार चारशे अठारा रू. फक्त) च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 510</u>:– {विद्युत झोन 08}

लकडगंज झोन क्र.०८, प्रभाग क्र. ३८ (ब) मध्ये गगांबाई घाट चौक ते शास्त्रीनगर चौक पर्यंत ९ मिटर ऑक्टॅगोनल खांब व एल.ई.डी. फिटींग लावुन प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु.३३,२१,०५५/- च्या प्राकलनास व हे काम ई-निवीदा बोलावुन करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 511</u>:– {लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. 36 (ब) मधील देशपांडे ले–आऊट आणि नेहरुनगर येथील नागनदीच्या भिंतीची दुरुस्ती करण्याकरिता रु. 3310882/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 512</u>:– {लोककर्म झोन 07}

प्रभाग क्र. 15 (ब) येथील विनोभा भावे नगर गल्ली नं 2,4,6,8,9 येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्यास्तव रु. 29,65,200/– रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 513</u>:– {स्थावर विभाग}

विविध उत्सवांच्या/समारंभांच्या वेळी सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर (फुटपाथवर) उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप/मंच/स्वागतद्वार/कमानी इत्यादींना परवानगी देण्यासंबंधात यासाठी निश्चित करण्यास्तव मार्गदर्शक तत्वे/धोरण नागपूर महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात आलेले असुन सदर्हु धोरणातील मुद्दा क्र. ५ मधील सुरक्षा ठेवीच्या शुल्कामधे रु. १,०००/– ऐवजी १०० चौ. फुट क्षेत्रफळ पावेतो मंडपाकरीता रु. २,५००/–, १०१.०० चौ. फुट ते ३००.०० चौ. फुट क्षेत्रफळाकरीता रु. ५,०००/– व ३०१.०० चौ. फुट पेक्षा अधिकचे क्षेत्रफळाकरीता रु. १०,०००/– एवढी राशी म्हणुन अनामत रक्कम आकारण्यास, मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 514</u>:– {प्रकल्प विभाग}

अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट येथे स्वामी विवेकानंद स्मारक सभोवतालच्या ओव्हर फ्लो कॅनलचे मजबुती करण्याचे कामाची निविदा प्रसारीत करण्यात आली होती त्यात एकुण 4 निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या. पैकी दोन निविदाकार अप्राप्त ठरले. व दोनच निविदाकार शिल्लक राहील्याने स्पर्धा होवू शकली नाही त्यामुळे या कामाची फेरनिविदा काढण्यात आली. या फेरनिविदेत सुध्दा फक्त एकच निविदाकार असल्याने पुनःश्च स्पर्धा होवु न शकल्याने निविदा न उघडण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यानच्या काळात प्रथम निविदेच्या वेळी निविदा सादर केलेले मे. आर्यमा इन्फ्रास्ट्रक्चर यांनी रिट पीटीशन नं. 3718/2016 उच्च न्यायालयात, मुंबई बेंच, नागपूर कडे प्रथम किंवा उपरोक्त काढण्यात फेरनिविदा रद्द करून जुन्या निविदेमध्ये झालेल्या स्पर्धेवरच मला काम देण्यात यावे असे निवेदन सादर केले.

सदर प्रकरणी मा. सभापती स्थायी समिती यांनी त्यांचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये या प्रकरणात ताबडतोब तोडगा काढण्याच्या अनुषंगाने व सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने या कामाचे नंतर व या कामवर अवलंबुन असलेले पूढील कामेसुध्दा खोंळबतील व प्रकल्प मनपाचे अपेक्षित कालावधीत पूर्ण करता येणार नाही. व त्याकरिता प्रथम निविदा प्रक्रियेत आलेले निविदाकार यांचेशी न्यायालयाच्या चाकोरीबाहेर राहुन अपिलकर्ता सोबत आपसात समझोता होऊ शकल्यास तसा निर्णय घेण्याच्या सुचना केल्या होत्या.

त्यास मा.आयुक्त यांनी प्रथम निविदा प्रक्रियेतील सारख्या दराच्या निविदा कारांकडून बंद लिफाफा पध्दतीने स्पर्धा करून निम्नतम निविदाराची निविदा स्विकारण्यास मान्यता प्रदान केली. त्या नुसार याबाबतची प्रक्रिया करण्यात आली आहे.

दि. 6/8/12 रोजी बंद लिफाफा पध्दतीने दोन्ही निविदाकारांचे प्राप्त लिफाफे उघडण्यात आले. त्यानुसार मे. आर्यमा इन्फ्रास्ट्रक्चर्स यांची 0.52 टक्के कमी दराची निविदा प्राप्त असुन देकाराची किंमत रूपये 54,87,792/- अशी प्राप्त झालेली आहे.

करीता अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट येथे स्वामी विवेकानंद स्मारक सभोतालच्या ओव्हर फ्लो कॅनलचे मजबुती करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदेपैकी मे. आर्यमा इन्फ्रास्ट्रक्चर्स यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा 0.52 प्रतिशत कमी दराची रू. 54,87,987/- दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 515:-**
**{उद्यान विभाग}**

प्रभाग क्र. 27 (ब), येथील गांधीसागर तलाव परिसरात खाऊ गल्ली तयार करण्याकरिता फ्लेम रेझीस्टंट स्टील फ्रेम स्ट्रक्चर उभारणी चे कामाचे रू 43,04,340 /- ( अक्षरी त्रेचाळीस लक्ष चार हजार तीनशे चाळीस फक्त) रक्कमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 365/दि. 06/08/2016 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त तिन निविदापैकी निम्मतम निविदा मे. Sprech Tensostructures PVT LTD. यांची 1.25 % कमी दराची रू. 42,50,536/- रक्कमेची निम्मतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. ( खर्च पद क्र. A28901341002 )

**ठराव क्रमांक 516:-**
**{लोककर्म झोन 1}**

प्रभाग क्र. 71 'ब' अंतर्गत मंगलधाम सोसा. टाकळी सिम येथे रोडच्या कडेला आय ब्लॉक लावण्याच्या कामास्तव रू. २६,७८,१७१/- (सव्वीस लक्ष, अठ्यात्तर हजार, एकशे एकहात्तर फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 517:-**
**{कार्य. अभियंता झो.पु.प्रा.}**

नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तर्फे न्यु पांढराबोडी च्या झोपडपट्टी मध्ये बी. एस.यु.पी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत पायाभूत सुविधांचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. दिप कंस्ट्रक्शन यांची १०.७७ % जास्त दराची निविदाचे वाटाघाटी यांची ०५.७७% दर कमी करुन ५% अधिक दराची निविदा मंजूर करण्याचा तसेच या निविदेतील महानगरपालिकेचा हिस्सा रु. १७.९१ लक्ष ची तरतूद पद क्र. A476013-60601 अंतर्गत मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 518:-**
**{कार्य.अभि. प्रकल्प}**

नागपूर शहराकरीता सिमेंट कॉक्रिट रोड फेज-II अंतर्गत, पॅकेज-01 मधील दक्षिण अंबाझरी रोड - वर्धा रोड वरील रहाटे कॉलनी टी पॉईन्ट ते माटे चौकापर्यंत (भाग 1) हा रस्ता सिमेंट कॉक्रिट चा तयार करण्याकरीता मे. अभि इंजिनिअरींग यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 11.96 टक्के कमी दराची रू. 11,69,39,409/- रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न स्थायी समितीने ठराव क्र. 722 दिनांक 29.02.2016 अन्वये विचारात घेवून पुढील नमूद मुद्दयांवर खुलासा करण्याचे निर्देशाच्या अनुषंगाने केलेल्या मुद्देनिहाय म.न.पा.चे कायदयाचे सल्लागार यांचे मे. अभि इंजिनिअरींग कार्पोरेशन प्रा. लि. यांनी सादर केलेले निविदा पात्रते बद्दलचे सर्व दस्तावेजा संदर्भात अभिमत घेण्यात आलेले होते व स्थायी समिती ठराव क्र. 254 दिनांक 27.06.2016 नुसार स्थायी समितीने सादर केलेल्या विभागीय प्रस्तावा संदर्भात फेर लघूनिविदा काढण्याची निर्देशीत केले होते. दरम्यान स्थायी समिती ठराव क्र.

390 दिनांक 6.08.2016 अन्वये समिती गठित करून इतर कॉंक्रिट रोडचे तत्सम प्रलंबित प्रकरणात समितीने तांत्रिक व कायदेशीर तसेच निविदेतील अटी व शर्ती याची पुर्तता आहे किंवा नाही याची तपासणी करून अशी प्रलंबित प्रकरणे अहवालासह स्थायी समिती समक्ष सादर करण्याचे निर्देशीत केले. त्यानुसार गठित समितीने या प्रकरणी मे. अभि इंजिनिअरींग यांनी निविदेमध्ये सहभागी होतांना पात्रतेकरीता आवश्यक अनुभवाचे प्रमाणपत्राची मौक्यावर केलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार शिफारस केल्या प्रमाणे मे. अभि इंजिनिअरींग कार्पोरेशन प्रा.लि. यांनी सादर केलेली सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 11.96 टक्के कमी दराची रू. 11,69,39,409/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याबाबत फेरविचार करून यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाच्या समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 519ः—</u>
{कार्य.अभि. प्रकल्प}

नागपूर शहराकरीता सिमेंट कॉंक्रिट रोड फेज—II अंतर्गत, पॅकेज—02 मधील 1) रस्ता क्र. 2 बी — दक्षिण अंबाझरी रोड, भाग 2 — माटे चौक ते अंबाझरी टी पॉईन्ट पर्यंत, 2) रस्ता क्र. 12 — मंगलमुर्ती चौक ते शितला माता मंदिर पर्यंत, 3) रस्ता क्र. 23 — आर.पी.टी.एस रोड — माधव नगर चौक ते वेस्ट हायकोर्ट रोड हे रस्ते सिमेंट कॉंक्रिट चे तयार करण्याकरीता मे. अभि इंजिनिअरींग यांची वाटाघाटी अंती सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 12.61 टक्के कमी दराची रू. 17,46,49,389/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न स्थायी समितीने ठराव क्र. 721 दिनांक 29.02. 2016 अन्वये विचारात घेवून पुढील नमूद मुद्दयांवर खुलासा करण्याचे निर्देशाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे केलेल्या मुद्देनिहाय म.न.पा.चे कायदयाचे सल्लागार यांचे मे. अभि इंजिनिअरींग कार्पोरेशन प्रा.लि. यांनी सादर केलेले निविदा पात्रते बद्दलचे सर्व दस्तावेजा संदर्भात अभिमत घेण्यात आलेले होते व स्थायी समिती ठराव क्र. 253 दिनांक 27.06.2016 नुसार स्थायी समितीने सादर केलेल्या विभागीय प्रस्तावा संदर्भात फेर लघूनिविदा काढण्याची निर्देशीत केले होते. दरम्यान स्थायी समिती ठराव क्र. 390 दिनांक 6.08.2016 अन्वये समिती गठित करून इतर कॉंक्रिट रोडचे तत्सम प्रलंबित प्रकरणात समितीने तांत्रिक व कायदेशीर तसेच निविदेतील अटी व शर्ती याची पुर्तता आहे किंवा नाही याची तपासणी करून अशी प्रलंबित प्रकरणे अहवालासह स्थायी समिती समक्ष सादर करण्याचे निर्देशीत केले. त्यानुसार गठित समितीने या प्रकरणी मे. अभि इंजिनिअरींग यांनी निविदेमध्ये सहभागी होतांना पात्रतेकरीता आवश्यक अनुभवाचे प्रमाणपत्राची मौक्यावर केलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी अहवालानुसार शिफारस केल्या प्रमाणे मे. अभि इंजिनिअरींग कार्पोरेशन प्रा.लि. यांनी सादर केलेली सुधारीत प्राकलनीय दरांपेक्षा 12.61 टक्के कमी दराची रू. 17,46,49,389/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याबाबत फेरविचार करून यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाच्या समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 520ः—</u>
{लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. 38 ब जूना बगडगंज येथे श्री बादूले ते ना. सु. प्र. मैदानापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे काम करण्यास्तव रु 40,66,707/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा.अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून रु. 41,44,130/— तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

**ठराव क्रमांक 521ः—** जरीपटका येथील रेल्वे कि.मी. १०४०/४—६ वरील
**{लोककर्म विभाग}** पुलाचे सुस्थिती व दुरूस्ती चे काम करण्याकरीता रेल्वे विभागाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या मागणी नूसार स्थायी समिती ठराव क्र. ३७६ दिनांक ०२.१२.२०१३ अन्वये प्राप्त मंजूरी प्रमाणे पुलाच्या सुस्थिती व दुरूस्तीच्या कामाकरीता रू. २५,४६,१७८/— व रू. ४२,०००/— पी ॲन्ड ई चार्जेस या प्रमाणे एकुण रू. २५,८८,१७८/— रेल्वे विभागात भरणा केलेला आहे.

रेल्वे विभागाने कळविल्याप्रमाणे सन् २०१४ मध्ये हे काम पुर्ण झाले असून काम १८.०० टक्के अधिक दरावर करण्यात आल्याने केलेल्या कामाची सुधारीत किंमत रू. २९,८२,४५९/— झाली आहे व रेल्वे विभागाने नियुक्त केलेले कामाचे कंत्राटदार यांना भुगतान करण्यास्तव उर्वरीत रू. ३,९४,२८१/— ची मागणी रेल्वे विभागाने केलेली आहे.

करिता या कामाचे रू. २९,८२,४५९/— चे सुधारीत खर्चास मंजूरी प्रदान करून उर्वरीत रू. ३,९४,२८१/— चा रेल्वे विभागास भरणा करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 522ः—** प्रभाग क्र. 31 (अ) येथील मस्कासाथ येथील पाठराबे मोहल्ला
**{लोककर्म झोन 07}** तीन नल चौक, खापरीपुरा इत्यादी ठिकाणी सी.सी.पेव्हमेंट करण्याच्या कामाकरिता निम्नतम निविदाकार मे. जी.बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 13 % ते कमी असलेली रु. 26,09,748/— ची निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 523ः—** प्रभाग क्र. 2 (ब) येथील राजगृह नगर, विश्राम नगर,
**{लोककर्म झोन 09}** अंगुलीमाल नगर, रमाई नगर, कामगार नगर कपील नगर, सुगत नगर येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्यास्तव रु. 29,99,560/— रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 524ः—** प्रभाग क्र. 2 (ब) येथील कामगार नगर, कपील नगर,
**{लोककर्म झोन 09}** अंगुलीमाल नगर, सहयोग नगर येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्यास्तव रु. 25,98,690/— रकमेच्या प्राकलनास व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 525ः—** 1. नागपूर शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे व
**{हॉटमिक्स प्लान्ट}** पॅचेस करण्याचे काम मंजूर निविदाकार मे. अंजनी लॉजीस्टीक यांचेकडील जेटपॅचर मशीनद्वारा करून घेण्यासंबंधातील स्थायी समिती ठराव क्रं. 76, दि. 19/09/2011, ठराव क्रं. 37, दि. 17/05/2012 व ठराव क्रं. 179, दि. 12/11/2012 मधील मान्यतेने स्विकारण्यात आलेल्या दायीत्वास अनुसरून मागील तीन वर्षात करण्यात आलेल्या रु. 15.00 कोटीच्या कामास कार्योत्तर मान्यता देणे.

2. स्थायी समिती ठराव क्र. 179 दि. 12.11.2012 अनवये मे अंजनी लॉजीस्टीक यांना प्रतिमाह 5000 चौ.मी काम देण्याची तरतूद मान्य आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र.37 दि. 17/05/2012 अन्वये पहिल्या वर्षी काम समाधानकारक असल्यास पुढील दोन वर्षांकरिता कराराचा कालावधी वाढविण्यास मान्यता आहे. तसेच तीन वर्षानंतर त्यापुढील दोन वर्षा करीता कराराचा कालावधी स्थायी समितीच्या मान्यतेने वाढविण्याची देखील तरतूद आहे.

या पुढील दोन वर्षाच्या मुदत वाढी करीता प्रस्तावीत करताना मागील तीन वर्षात सरासरीने करण्यात आलेल्या कामाच्या आधारे अदमासे 100000 चौ.मी. कामापैकी केवळ 75% काम म्हणजेच

75000 चौ.मी काम आवश्यकता भासेल तसे पुढील दोन वर्षात जेट पॅचर मशीनद्वारा करण्यात येईल. तथापी, यापैकी प्रथम टप्प्यात 20000 चौ.मी चे काम विचारात घेण्यात आले आहे.

तसेच निविदाकार मे अंजनी लॉजीस्टिक यांच्याशी त्यांच्या मंजूर निविदा दराबाबत फेरविचार व वाटाघाटी करण्यात येवून त्यांनी कमी केलेल्या रू. 1015/– प्रती चौ.मी. या दरास मान्यता देणे व या दरानुसार प्रथम टप्प्यातील कामाकरीता रू. 2,03,00000/– च्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करून कमी केलेल्या 1015/– प्रती चौ.मी. दरावर मागील धर्तीवर पुढील दोन वर्षात आवश्यक असेल तेव्हा निधिच्या उपलब्धते प्रमाणे काम करून घेण्यात येईल. तसेच प्रत्यक्ष केलेल्या कामाचे भुगतान करून कार्योतर मान्यता देण्यात येईल. या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ठराव क्र. 37 दि. 17.05.2012 प्रमाणे 15 कोटीची प्रशासकीय मान्यता पूर्वीच्या स्थायी समितीने दिली आहे. त्यामुळे पुन्हा कार्योत्तर मंजूरी घेण्याची गरज नाही असे या स्थायी समितीचे मत आहे.

मूळ निविदा जी मंजूर झाली आहे त्यात केलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्ती मध्ये बदल करता येतो का याची कारण मिमांसा प्रशासनाने करावी. प्रस्तावित विषय एक आठवडयात पुन्हा स्थायी समिती समोर सादर करावा या सूचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 526ः– {विद्युत विभाग} नागपूर महानगरपाालिका ठराव क्र. १३६ दिनांक २१.०८.२०१५ नुसार नागपूर शहरातील पारंपारीक पथदिवे एल.ई.डी. पथदिवे बदलविण्याकरीता येणा–या खर्चाची रक्कम एनर्जी सेव्हिंग मधुन वळती करण्यापेक्षा नागपूर महानगरपालिकेला स्वतः खरेदी करुन लावणे सोयीचे व फायदेशीर होत असल्यास या दोन्ही बाबींचे आकलन करुन नागपूर महानगरपालिकेला जे फायदेशीर असेल त्या अनुषंगाने प्रशासनाने विचार करुन आवश्यक कार्यवाही करावी अश्या रितीने सदर प्रकरणास मंजूरी दिलेली असण्याचा विचार करता स्वतः खरेदी करुन लावणे करीता निधीची उपलब्धता कर्ज उभारणीकरीता आवश्यक मंजूरी/अडचण इत्यादी बाबींचा विचार करता व ईतर सर्व महानगरपालिकांमधेही बचतीतुन परतफेड करण्याची पध्दत अवलंबिण्यात येत असल्याचा विचार करता वर नमुद केल्याचे अनुषंगाने एस्क्रो अकाऊंट च्या पर्यायासह सहा महिन्यांचे एकुण भुगतानाच्या रकमेएवढी बॅंक गॅरंटी नागपूर महानगरपालिकेतर्फे कंत्राटदारास उपलब्ध करवून देण्यास व ही बॅंक गॅरंटी कंत्राटाच्या कालावधी मधे आपोआप नविनीकरण हाईल अशी तजविज करुन अश्या दोन्ही प्रकारच्या सेव्हिंग “ उर्जा बचत ” व “ मनुष्यबळ, वाहने इ. पोटी होणा–या खर्चातील बचत + साहित्य खरेदीपोटी होणारी बचत ” मधुन कंत्राटदारास किती हिस्सा हवा आहे व ते नागपूर महानगरपालिकेस किती देणार आहेत अश्याप्रकारे झोनल निविदा मागविण्यास तसेच मेट्रो रेल रुट वरील कामाचे भुगतान काम झाल्यावर लगेच करण्यात येईल या दृष्टीने या कामाकरीता निविदेमधे दर मागविण्यास व स्थायी समितीच्या मंजूरीनंतर नागपूर महानगरपालिकेच्या पीपीपी सेलपुढे “ निविदा प्रपत्र “ मंजूरीस्तव ठेवण्यास मंजूरी प्रदान करण्यास व स्थापत्य, विद्युत व प्रकल्प समितीच्या अहवाालासह स्थायी समितीपुढे सदर प्रस्ताव ठेवण्यास मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**नागपूर महानगरपालिका ठराव क्र. १३६ दिनांक २१.०८.२०१५ नुसार नागपूर शहरातील पारंपारिक पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी बदलविण्याकरिता येणाऱ्या खर्चाची रक्कम एनर्जी सेव्हिंग मधून वळती करण्यापेक्षा नागपूर महानगरपालिकेला स्वतः खरेदी करून लावणे सोयीचे व फायदेशीर होत असल्यास या दोन्ही बाबींचे आकलन करून नागपूर महानगरपालिकेला जे फायदेशीर असेल त्या अनुषंगाने प्रशासनाने विचार करून आवश्यक कार्यवाही करावी अशा रितीने सदर प्रकरणास मंजूरी दिलेली असण्याचा विचार करता स्वतः खरेदी करून लावणे करिता निधीची उपलब्धता कर्ज उभारणीकरिता आवश्यक मंजूरी/अडचण इत्यादी बाबींचा विचार करता व इतर सर्व महानगरपालिकांमध्येही बचतीतून परतफेड करण्याची पद्धत अवलंबिण्यात येत असल्याचा विचार करता वर नमूद केल्याचे अनुषंगाने 'एस्क्रो अकाऊंट'**

च्या पर्यायासह सहा महिन्यांचे एकूण भूगतानाच्या रकमेएवढी बँक गॅरंटी नागपूरच्या महानगरपालिकेतर्फे कंत्राटदारास उपलब्ध करवून देण्यास व ही बँक गॅरंटी कंत्राटाच्या कालावधीमध्ये आपोआप नविनीकरण होईल अशी तजवीज करून अशा दोन्ही प्रकारच्या सेव्हिंग ''ऊर्जा बचत'' व ''मनुष्यबळ, वाहने इ. पोटी होणाऱ्या खर्चातील बचत + साहित्य खरेदीपोटी होणारी बचत'' मधून कंत्राटदारांस किती हिस्सा हवा आहे व ते नागपूर महानगरपालिकेस किती देणार आहेत अश्या प्रकारे झोनल निविदा मागविण्यास तसेच मेट्रो रेल रुट वरील कामाचे भूगतान काम झाल्यावर लगेच करण्यात येईल या दृष्टीने या कामाकरिता निविदेमध्ये दर मागविण्यास व स्थायी समितीच्या मंजूरीनंतर नागपूर महानगरपालिकेच्या पीपीसी सेलपुढे 'निविदा प्रपत्र' मंजूरीस्तव ठेवण्याचा प्रश्न तसेच स्थापत्य, विद्युत व प्रकल्प समितीच्या अहवालाचा विचार करता तसेच विभागातर्फे सदर प्रश्नासंबंधी उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाचा विचार करून प्रशासनातर्फे ठेवण्यात आलेल्या प्रस्तावास खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात येते.

१) स्थायी समिती व महासभेने दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने व फक्त एकाच कंत्राटदारांस संपूर्ण शहराची जबाबदारी दिल्यानंतरचा पुर्वानुभव बघता या कामाकरिता झोननिहाय निविदा मागविण्यात याव्या. मात्र प्रत्येक झोन करिता वेगवेगळया निविदा न मागविता सर्व झोन्सकरिता एकत्रित रित्या निविदा मागवाव्या व त्यामध्ये निविदाकारांस प्रत्येक झोनकरिता निविदा दर देण्याची मुभा राहील अशी तजवीज करावी मात्र कोणत्याही निविदाकारांस एक झोनपेक्षा जास्त झोनची जबाबदारी देण्यात येणार नाही, अगदी अपरिहार्य स्थितीतच एक पेक्षा जास्त झोन्सूची जबाबदारी देण्यात येईल मात्र अश्या स्थितीतही एका निविदाकारांस दोन झोन्स्पेक्षा जास्त झोन्सुची जबाबदारी देण्यात येणार नाही अशा प्रकारे निविदा प्रपत्रांत अटी शर्तीचा समावेश करण्यात यावा. तसेच भविष्यात झोन्समधील प्रभागांची संख्या कमी जास्त होणे या शक्यतेचा विचार करता सर्व झोन्स्मधे पथदिव्यांची संख्या शक्यतो सारखी ठेवण्यात यावी, या पथदिव्यांचे संपूर्ण सर्किटस/ त्या विशिष्ट झोन अंतर्गत असावे अशी तजविज करावी जेणे करुन एनर्जी सेव्हिंगचे मॉनीटरींग व्यवस्थित होऊ शकेल.

२) एनर्जी सेव्हिंग मधून निविदाकारास किती हिस्सा हवा आहे अशा प्रकारे निविदा बोलाविण्यात आल्यास. इतर महानगरपालिकांमध्ये व नागपूर महानगरपालिकेमधेही जवळपास ९० टक्के हिस्सा निविदाकारांस/कंत्राटदारांस द्यावा लागलेला आहे त्याचा विचार करता 'ई.एम.आय.' बेसीसवर निविदा बोलाविण्यास महानगरपालिकेची आर्थिक बचत होऊ शकते याचा विचार करता 'एल.ई.डी. पथदिव्यांचा पुरवठा करणे' तसेच ''इन्फ्रास्ट्रक्चर स्ट्रेदनिंगचे (तुटलेले खांब बदलविणे, निकामी केबल्स् बदलविणे, स्मार्ट कंट्रोलर्स बसविणे, इ.) कामाकरिता'' अश्या दोन्ही प्रकारच्या कामाकरिता ७ वर्षांच्या कालावधीकरिता ई. एम.आय.देण्याच्या अनुषंगाने निविदा मागविण्यात याव्या. मेट्रोरूटवरील कामाकरिता काम झाल्यावर रेग्युलर पद्धतीने भूगतान करण्याच्या अनुषंगाने निविदेमध्ये दर मागवावे.

३) विभागातर्फे नस्तीमध्ये नमूद केलेल्या स्पेसिफिकेशन्स प्रमाणे उच्च दर्जाचे एल.ई.डी. पथदिवे नागपूर महानगरपालिकेस उपलब्ध होण्याचे दृष्टिने एल.ई.डी. पथदिव्यांच्या उत्पादकांच्या पात्रतेकरिता त्यांचे नेटवर्थ नागपूर महानगरपालिकेने एल.ई.डी. पथदिव्यांच्या खरेदीकरिता तयार केलेल्या प्राकलनीय रकमेपेक्षा कमी असू नये व त्याची वार्षिक उलाढाल या रकमेच्या निदान पाच पट तरी असावी तसेच त्यांनी मागील दोन वर्षात कमीत कमी १,२५,००० एल.ई.डी. पथदिव्यांचा पुरवठा केलेला असावा अशी अट निविदा प्रपत्रांत नमूद असावी.

४) नागपूर महानगरपालिकेकरिता पथदिव्यांची वेळेवर देखभाल, दुरूस्ती होऊन पथदिवे सुरू असणे हा भाग सर्वात महत्वाचा असल्याने या कामाकरिता पथदिवे देखभाल दुरूस्तीचा कमीत कमी पाच

वर्षांचा पुरेसा अनुभव असावा अशी निविदा प्रपत्रांत अट असावी. पथदिव्यांशी संबंधित कामे (पथदिव्याचा पुरवठा करणे व बसविणे इ.) करण्याचा ही पुरेसा अनुभव असावा अशी अट देखील असावी. तसेच ज्या पात्र उत्पादकांचे पथदिवे हे कंत्राटदार पुरवठा करणार आहेत अशा पात्र उत्पादकांतर्फे निविदाकारांस हे पथदिवे उपलब्ध करण्यात येण्याची हमी राहावी व कंत्राटदाराने उत्पादकामार्फत या पथदिव्यांच्या परफॉमर्सन्स् संबंधी हमी रहावी या अनुषंगाने संयुक्तीक रकमेची बँक गॅरंटी दयावी अशी अट निविदा प्रपत्रात नमूद असावी.

५) यामध्ये सुरूवातीला संपूर्णपणे गुंतवणूक कंत्राटदारातर्फे होणार असल्याचा विचार करता प्रकल्प यशस्विरित्या पूर्ण करण्याचे अनुषंगाने कंत्राटदारांस ६ महिन्यांचे कालावधीकरिता एकूण ई.एम.आय. ची जी रक्कम होते त्या रकमेची बँक गॅरंटी उपलब्ध करवून देण्याची व ही बँक गॅरंटी प्रशासनातर्फे प्रस्तावित केल्यानुसार दर ६ महिन्यांनी या बँक गॅरंटीचे आपोआप (Automatically) नुतनीकरण होईल अशी तजवीज असावी.

६) सद्यस्थितीत विविध मंजूर झालेल्या कामांमध्ये तसेच मंजूरीच्या प्रक्रियेमध्ये असलेल्या ज्या कामांमध्ये पथदिवे बसविणे अंतर्भूत आहे त्या कामातील पथदिव्यांचा सदर प्रस्तावातील कामात समावेश करावा व या प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या कंत्राटामध्ये पथदिवे बसविण्याचा जो अवधी आहे त्यामध्ये जे नविन पथदिवे लावावयाचे काम राहील त्याचाही सदर प्रस्तावातील कामांमध्ये समावेश राहील या दृष्टिने कार्यवाही करावी जेणेकरुन या पथदिव्यांचे एकरकमी भूगतान करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही व पुढील सात वर्षांकरिता देखभाल दुरुस्ती तसेच या पथदिव्यांच्या दुरुस्तीकरिता साहित्य पुरवठा करण्याच्या जबाबदारीचाही प्रश्न उद्‌भवणार नाही.

७) सदर ठरावाचे कार्यान्वियन झाल्यावर पाच दिवसांचे आंत निविदा प्रपत्र तयार करून नागपूर महानगरपालिकेच्या पी.पी.सी.सेलपुढे ठेवण्यात यावे व त्यानंतर तीन दिवसांमध्ये पी. पी.सी. सेलमार्फत मंजूरी देण्याची प्रक्रिया पार पाडण्याच्या अनुषंगाने कार्यवाही व्हावी तसेच पी.पी.सी. सेलने मंजूरी दिल्यानंतर निविदा प्रपत्रामध्ये आवश्यक फेरबदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष स्थायी समिती यांना देण्यात येतात तसेच निविदा बोलाविल्यानंतर प्री-बिड मिटींगचे अनुषंगाने निविदा प्रपत्रांत फेरबदल करण्याची वेळ आल्यास अश्या फेरबदलास मा. अध्यक्ष स्थायी समिती यांची मंजुरी घेवूनच असे फेरबदल करण्यास ही स्थायी समिती मंजूरी प्रदान करते.

८) प्रस्तावित निविदा प्रसिध्द होई पर्यंत व प्रत्यक्षात काम सुरु होई पर्यंत शहरातील पथदिवे दुरुस्ती, सुस्थिती व देखभाल करण्याबाबत कार्यालयाने काय उपाययोजना केल्या आहेत असे स्थायी समितीद्वारे विचारले असता कार्यालयाने खालील प्रमाणे आपले मत स्पष्ट केले की, मुख्य रस्त्यांवरील पथदिवे एल.ई.डी. दिवे बदलविण्याचे कंत्राट ज्या कंत्राटदारास देण्यात आले आहेत त्यांचे मार्फत हे काम समाधानकारक रुपाने होत नसल्याने या कंत्राटात अंतर्भुत नसलेल्या पथदिव्यांच्या दिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीचे जे झोन निहाय काम इतर कंत्राटदारांना देण्यात आले आहे त्यांचेकडून मुख्य रस्त्यांवरील पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीचे कामही संबंधित कंत्राटदाराच्या ''जबाबदारीवर व खर्चाने'' (रिस्क ॲन्ड कॉस्ट) या झोन निहाय कंत्राटदाराकडून करुन घेत असल्याची बाब लक्षात घेता व या झोन निहाय कंत्राटाकरिता स्थायी समिती ठराव क्र. ५८४ दि. १/२/२०१६ अन्वये ६ महिन्याच्या कालावधीकरिता बोलविण्यात आलेल्या रु. ६.७८ कोटी खर्चाचे हे काम पहिल्या टप्प्यात फक्त रु. ३.४० कोटी खर्च सिमीत ठेवून काम करण्याची मंजूरी दिलेली असण्याचा विचार करता या देखभाल दुरुस्तीचा खर्च तुर्त रु. ६.७८ कोटी सिमीत ठेवून हे काम करण्यास व आता वर नमुद केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने निविदा होऊन काम सुरु होण्याच्या कालावधी पर्यंत या झोन निहाय कामास मुदतवाढ देण्यासही मंजूरी प्रदान करण्यात येते जेणे

**करुन नागपूर शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे हे काम सुरळीतपणे सुरु रहाणे शक्य होईल या कार्यालयाच्या मताच्या अनुषंगाने स्थायी समितीने केलेल्या वरील सुचनेसह प्रस्तावित विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 527 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर